**नि.फौ.प्र.क्र./३६/२०१८**

**सरकार–वि– मिथुन**

**नि.क्र. ४७**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०४

मी शपथेवर खरे सांगतो की,

नावः – प्रखर रामनारायण गुप्ता, वय ५० वर्ष,

कामधंदा –व्यवसाय, रा. पंचशील वॉर्ड साकोली, तह. साकोली , जि. भंडारा.

**साक्षीदाराचा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी अधिवक्ता श्रीमती पी. बी. नवनागे यांच्यामार्फत**

मी आरोपीला ओळखतो. पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता राष्ट्रीय महामार्गावर काठीयावाड धाब्याजवळ पंचनामा कर्यवाही करीता बोलाविले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष दगड जप्त केला होता. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी पंच क्र.२ म्हणून सहया असून मजकुर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ४८ व ४९** देण्यात येते.

सरतपास समाप्त.

**उलटतपास आरोपी तर्फे अधिवक्ता श्री. पी. डब्ल्यु. खोब्रागडे यांच्यामार्फत सुरुः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनाम्याकारीता सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझ्या मावशीचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेले गोटे रस्त्यावर पडून असतात. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकुर मी वाचुन बघितला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मजकुर वाचुन दाखविला नाही. कोणत्या तारखेला पंचनामा तयार केला ती तारीख आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा भाऊ असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास समाप्त**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

VISHAL MAHANAND GAIKWAD

Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2025.04.25 17:18:37 +0530

(व्ही.एम. गायकवाड)

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली.

२५/०४/२०२५